स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ३१ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि नोव्होटा थर्मोटेक प्रा. लि.,मुंबई यांच्यात सोमवार दि. ३१ ऑक्टोबर रोजी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. थर्मली इन्सुलेटेड कोटींग संदर्भात हा करार करण्यात आला आहे.

नोव्होटा या कंपनीने त्यांच्या नवीन कार्यात्मक कोटींग विकासनासाठी विद्यापीठाच्या रसायन शास्त्र प्रशाळेकडे मार्गदर्शन आणि सहाय्य प्राप्त होण्यासाठी संपर्क साधला होता. थर्मल इन्सुलेटेड कोटींग संदर्भात व डेटा विकसित करण्यासाठी त्यांना या प्रशाळेकडून सल्ला दिला जाणार आहे. ही कंपनी कोटींग मध्ये अग्रेसर आहे. या सामंजस्य करारामुळे रसायनशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना देखील कोटींगच्या संदर्भात या कंपनीत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या सामंजस्य करारावर विद्यापीठाकडून कुलसचिव डॉ. विनोद पाटील व कंपनीकडून व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र चौधरी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, प्रशाळेचे संचालक प्रा. डी.एच. मोरे, प्रा. पी.पी. माहुलीकर, प्रा. विकास गीते, प्रा.अमरदिप पाटील यांची उपस्थिती होती.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने. रन फॉर युनीटी अंतर्गत एकता दौड काढण्यात आली. तसेच स्वच्छ भारत अभियान व प्लास्टिक मुक्ती अभियानाअंतर्गत १० किलो प्लास्टीक संकलित करण्यात आले.

प्रशासकीय इमारतीत सरदार वल्लभभाई पटेल तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी राष्ट्रीय एकता दिनाची शपथ जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी दिली. रा.से.यो. विभाग व समाजकार्य विभागातील रा.से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या एकता दौडीस कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी हिरवी झेंडी दिली. यामध्ये ६० स्वयंसेवक सहभागी होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. या रा.से.यो. स्वयंसेवकांनी विद्यापीठ परीसरात १० किलो प्लास्टिक संकलित करून महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे सुपूर्द केले या अभियाना प्रसंगी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील, सहायक कार्यक्रम अधिकारी शरद पाटील, कक्ष अधिकारी कैलास औटी, शिवाजी पाटील यांनी परिश्रम घेतले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी